Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 427-430
DOI: 10.5281/zenodo.10130789

Original Research Article

# गांधी विचार एक चिंतन..

प्रा. डॉ. वसंत कदम

इतिहास विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जिल्हा: नांदेड ४३१८०२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: vkadam4@gmail.com

Received: 09 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

ऐतिहासिक कालखंडामध्ये या पृथ्वीतलावर जे काही महामानव, महानायक, महान क्रांतिकारक, महान योध्दे, महान विचारवंत, आणि महान संत होऊन गेले, त्यामध्ये भारतीयांचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या नावाचा विश्वातील इतिहासामध्ये अग्रक्रमाने उल्लेख केला जातो. महात्मा गांधीजी नावाच्या महामानवाने भारतीलच नव्हे तर, विश्वातील सर्व मानवप्राणी मात्रांच्या हिताचा ध्यास घेऊन, नवसमाज निर्मितीचे दिव्य मानवतावादी तत्त्वज्ञान मांडण्याचे महान कार्य केले. महात्मा गांधीजींनी मांडलेले तत्वज्ञान आत्मशांती पासून ते विश्वशांती पर्यंत, गावपातळी पासून ते विश्वपातळी पर्यंत, शांती साधक अहिंसे पासून ते क्रांतिकारी अहिंसे पर्यंत, त्यांचे विचार संबंध मानवी जीवनासाठी प्रेरणास्थान बनले आहेत. म्हणूनच संपूर्ण जगात त्यांच्या सत्य व अहिंसेची भक्ती लोक करतात, मानव जातीच्या कल्याणाचा सातत्याने विचार करून, सर्वांचे कल्याण हेच आपले कल्याण असे त्यांनी तत्वज्ञान मांडले.त्यामुळेच जगातील महान चिंतक व विचारवंतांनी आधुनिक काळातील एक थोर संत, एक युग पुरुष म्हणून त्यांचा गौरव आज भारतभर नव्हे तर जगभर सर्वत्र,सर्वच स्तरातून होत आहे. सत्य, अहिंसा आणि आत्मबळाने नैतिक समस्या सोडविण्याचा नवा विचार महात्मा गांधीजींनी जगाला दिला. मानवी संघर्ष मिटविण्यसाठी जेथे शस्त्रबळ आणि बुद्धीबळ कमी पडते, तेथे गांधीजींनी आत्मबळ हा मार्ग सांगितला. गांधीजींनी भारतीयांची मानसिकता ओळखून आत्मबळाचा मार्ग स्वीकारला. वैराला-वैराणी, हिंसेला-हिंसेने नाही तर, वैराला- प्रेमाने व हिंसेला- अहिंसेने उत्तर देण्याचा सत्याग्रही मार्ग त्यांनी भारतीयांनाच नव्हे तर जगाला दिला, जगातील कुठलाही अन्याय व अत्याचार संपविण्यासाठी, अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सत्य व अहिंसा हाच मार्ग असल्याचे त्यांनी जगाला पटवून दिले. सदरील शोधनिबंधात गांधी विचार एक चिंतन हा विषय प्रस्तुत केलेला आहे.

श्री वाय जी कृष्णमूर्ती हे एक नामांकित विचारवंत आणि गांधी अभ्यासक आहेत. त्यांनी 'महात्मा गांधी संत की क्रांतिकारक' या संबंधाने विचार मांडत असताना म्हणाले की, महात्मा गांधी हे केवळ एक संत नव्हे तर, ते एक महान क्रांतिकारक सुद्धा होते. ते जहाल क्रांतिकारक म्हटले तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही. लोकांना भ्रमजालात गुंगवून ठेवणाऱ्या संतापैकी नव्हते किंवा ते सहांरक वृत्तीचे क्रांतिकारकही नव्हते. याला हा संत अपवाद होता. या उलट ते विधायक किंवा रचनात्मक प्रवृत्ती असलेले उच्च श्रेणीतील क्रांतिकारक होते. संत आणि क्रांतिकारक या दोघांच्या दोन वेगवेगळया प्रवृत्ती आणि स्वभाव धर्म असतो. परंतु महात्मा गांधींच्या जीवनात या दोघांचा एक विलक्षण संयोग दिसून येतो.त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व काहीसे गुंतागुंतीचे सुद्धा दिसून येते. सत्य वचन, सत्य आणि जनसेवा हे संतांचे प्राचीन लक्षण आहे, ते गांधीजी मध्ये दिसुन येते. त्याचबरोबर गांधीजींनी जगवाशीयांना अहिंसक क्रांतीची दीक्षा देऊन त्याचे राजकीय परिणाम आपल्याला दाखवून संत हे क्रांतिकारक देखील होऊ शकतात हे दाखवून दिले.

स्वातंत्र्य आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या बाबतीत गांधीजी म्हणतात, सामाजिक, राजकीय ,आर्थिक संघर्ष करून स्वातंत्र्य मिळवणे, म्हणजे स्वातंत्र्य नाही तर प्रत्येक व्यक्तीला स्वतःशी आणि स्वतःबाहेरील अपप्रवृत्तीशी संघर्ष करावयाचा आहे, आणि स्वातंत्र्य मिळवायचे आहे, ते स्वतःच्या मनात बसलेल्या अपप्रवृत्ती वर.तसेच केवळ ब्रिटिशांच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर, सामाजिक स्वातंत्र्य संपादन करावयाचे आहे ते जातीय विषमता निर्मूलन करून. केवळ परकीय राजवट उलथून टाकने म्हणजे स्वातंत्र्य नव्हे. तर मानव प्राण्यांने स्वतःसाठी जीवन जगत असताना समाजाची सेवा केली पाहिजे, रुग्णांची सेवा, महारोग्यांची सेवा, निराधाराला आधार, दुःखी माणसाला आनंद आणि भुकेलेल्यांना आहार द्यायला पाहिजे, याचेच नाव स्वातंत्र्य आहे. आपली राजकीय गुलामगिरी संपली आणि आपण राज्यघटना स्वीकारली म्हणजे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असे नाही, तर स्वातंत्र्याचा विचार आचरणात आणला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळाले असे म्हणता येईल.

स्वातंत्र्य भारतातील मंत्री, सत्ताधाऱ्यांचे आणि, राज्यकर्त्यांचे कर्तव्य गांधींच्या विचारातून आपल्या लक्षात येते. काही दिवसात सत्ता भारतीयांच्या हातात येणार होती. तेव्हा स्वतंत्र भारतातील मंत्री, राज्यकर्ते कसे असावेत याबाबत गांधीजींचे विचार सुरू होते. त्यांच्या एका दौऱ्यात बिहार मंत्रिमंडळ त्यांना भेटायला आले, तेव्हा हा विषय चर्चेला आला ते म्हणाले...

मंत्री, राज्यकर्त्यांनी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी शक्यतो आपल्या देशात तयार झालेल्या स्वदेशी वस्तूचाच (खादीचा)वापर करावा. राज्यकर्त्यांनी स्थानिक आणि राष्ट्रीय दोन भाषा (लिप्या) शिकून घ्याव्यात. आपापसात बोलताना इंग्रजी चा वापर शक्यतो टाळावा. सार्वजनिक रित्या तर हिंदीचाच वापर झाला पाहिजे, सर्वांनी आपली प्रांतीय भाषा अगदी मनमोकळेपणे बोलावी. कार्यालयामध्ये हिंदुस्तानी भाषेचा वापर व्हावा, आणि आदेश किंवा परिपत्रके हे तर हिंदुस्तानीतच निघाली पाहिजेत, यामुळे लोकांना हिंदुस्तानी भाषा शिकण्याचा उत्साह वाढेल त्यामुळे हळूहळू हिंदुस्तानी हीच भारतीयांची राष्ट्रभाषा होईल. तसेच मंत्र्याच्या मनात अस्पृश्यता, जात-पात आणि तु-मी ची

भावना मुळीच नसावी. आपला-परका, पुत्र-बंधू, जवळचा - दुरचा, ग्रामीण-शहरी आणी शेतकरी-मजूर या सर्वांना सत्ताधाऱ्यांच्या मनात समान स्थान असावे.

सत्ताधाऱ्यांचे वैयक्तिक जीवन इतके साधे आणि सरळ असावे की, त्याचा देशातील कोटी कोटी जनतेवर नकळत परिणाम व्हावा. सत्ताधाऱ्यांनी दररोज कमीत कमी एक तास तरी शारीरिक श्रमाचे काम करावे, मग ते चरख्यावर सुतकातण्याचे असो किंवा आपल्या शेतात, परिसरात अन्नधान्य, भाजीपाला लावून देशाच्या उत्पादनात भर घालण्याचे असो. सत्ताधाऱ्यांना मोटार किंवा बंगला तर आसताच काम नये. मात्र खास जरुरी कामे किंवा दुरवरच्या अंतरासाठी गरजेनुसार मोटार वापरायला हरकत नसावी, परंतु मोटारीचा उपयोग मर्यादित आणि विवेकपूर्ण असावा. तसेच राज्यकर्त्यांचे घरही आवश्यक तेवढे आणि बेताचेच असावे.

राज्यकर्त्याच्या कुटुंबातील लोकांनी स्वतःची कामे स्वतःच करावीत, नोकराची मदत कमीत कमी घ्यावी.

आज देशातील करोडो लोकांना बसायला साधे घर, सतरंजीत काय पण अंगभर वस्त्र सुद्धा मिळत नाहीत तेंव्हा राज्यकर्त्यांनी आपल्या घरात परदेशी वस्तू, सोफासेट, चकचकीत अलमाऱ्या आणि चमकदार फर्निचर याचा वापर करू नयेत.

गांधीजींना असे वाटत होती की, मंत्र्यांची घरे जवळ जवळ असावीत जेणेकरून त्यांना परस्पराशी विचारविनिमय, कामातील सहयोग आणि कुटुंबातील जवळीकता हे सहज साध्य होईल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे राज्यकर्त्यांना कोणतेच व्यसन नसावे, व्यसन असलेल्या व्यक्तींना राज्यकर्ता म्हणून घेण्याचा नैतिक अधिकारच नाही.

एकदा कलकत्त्याचे मंत्री गांधीजींच्या भेटीसाठी आले. त्यांनी प्रणाम केल्यावर गांधीजी त्यांना म्हणाले…आज तुम्ही काटेरी मुकुट धारण करीत आहात. सत्ता वाईट असते. सरकारात विवेकपूर्ण व्यवहार करा, स्वतःच्या वैभवात गुंतू नका, तुम्हाला गरिबाचा उद्धार करावयाचा आहे. इंग्रजांशी लढताना कसोटी होती, पण आता क्षणाक्षणाला कठीण कसोटी आहे. तुम्हाला अधिक सत्यपरायण, अहिंसापरायण, नम्र आणि सहनशील बनले पाहिजे ईश्वर तुम्हाला सहाय्य करो ही सदिच्छा.

अशा पद्धतीने गांधीजींनी सत्ताधाऱ्यांच्या संदर्भात विवेकपूर्ण, नैतिक अधिकार, जबाबदारी आणि व्यवहाराची अपेक्षा केली. परंतु आज देशात राजकीय पक्ष आणि सत्ताधाऱ्यांच्या बाबतीत विदारक परिस्थिती दिसून येत आहे.

## सांराश

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा पुरस्कार केला. ते म्हणतात आत्मपरीक्षण करा आत डोकावून पहा जिथे जिथे जुलूम दिसेल तिथे तिथे त्याचा प्रतिकार करा. तुमच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होत असेल, तर सर्व शक्तीनिशी त्याचा प्रतिकार करा. पण जुलूम करणाऱ्याचे रक्त न सांडता हे करा. रक्त सांडायला आपला धर्म शिकवीत

नाही. तो अहिंसेवर आधारलेला आहे, प्रेम हे अहिंसेचेच दुसरे रूप आहे, शेजाऱ्यावर व परस्परांवर एवढेच नाही तर शत्रूवरही प्रेम करा.गांधीजीची अहिंसेबद्दलची निष्ठा जग जाहीर आहे. त्यांच्या अहिंसा या तत्त्वामुळे माणसे डरपोक होतात असा एक गैरसमज फार मोठ्या प्रमाणात आहे, किंवा हेतूपुरस्कर पसरवला जात आहे. पण तो अत्यंत चुकीचा आहे. खरे पाहता गांधीजींना कोणत्या एका गोष्टीची अतिशय चिड असेल तर,ती डरपोकपणाची,भ्याडपणाची व भित्र्या माणसाची. भ्याडपणाचा त्यांनी धिक्कार करून भ्याडांचे संरक्षण खुद परमेश्वरही करू शकत नाही असे ते म्हणतात. त्यांच्या आयुष्यात अशी शेकडो उदाहरणे दाखवता येतात की कोणत्याही संकटासमोर त्यांनी गुडघे टिकवले नाहीत, अगदी फाळणी नंतर उसळलेल्या हिंदू मुस्लिम दंग्याच्या वेळी लोकांचे अश्रू पुसण्यासाठी ते नौखाली आणि बिहारमध्ये गेले. तेव्हा सुद्धा हिम्मत राखून भ्याडपणा सोडण्याचा संदेश त्यांनी तिथल्या लोकांना दिला. भारतीयांचे दुर्दैव असे की 30 जानेवारी1948 संध्याकाळी प्रार्थनेसाठी निघालेल्या अहिंसेच्या पुजाऱ्याचा गोळया घालून खून करण्यात आला. एका भारतीयांनी हे भीषण कृत्य केले आणि राष्ट्रपिता भारताला पोरके करून गेला नव्हे तर त्यांच्या मृत्यूने मानवताच पोरगी झाली. गांधीजींच्या मृत्यूने सारे जग हळहळले, इतर कोणाच्या मृत्यूने एवढे व्यापक आणि तीव्र दुःख झाल्याची नोंद जगाच्या प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासात सापडत नाही.

जगातील सर्वच विचारवंत, मुत्सद्दी,सेनाधिकारी, शास्त्रज्ञ यांनी एक मुखाने गांधीजींची थोरवी मान्य केली. गांधीजींच्या वैचारिक मार्गाने गेल्याशिवाय जगात शांतता आणि सौहार्द निर्माण होणार नाही असे सार्वत्रिक मत व्यक्त झाले.

**संदर्भग्रंथ**


१. वेले विजया., गांधी: विविध दर्शन., महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, प्रकाशन,. कोथरूड, पुणे,. 30 जानेवारी 1998.

२. डॉ. आचार्य धनंजय., गांधीयुग., श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. शिंदे ज.रा., आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत., कैलास पब्लिकेशन., प्रथम आवृत्ती, औरंगाबाद.

४. सारथी अरुण., शोध महात्मा गांधींचा., अस्मिता प्रकाशन, पुणे.

५. महात्मा गांधीजी., हिंद स्वराज्य., परंधाम प्रकाशन.,पवनार. 1998.

६. मोरे सदानंद., लोकमान्य ते महात्मा., खंड पहिला., राजहंस प्रकाशन., पुणे.

७. डॉ. कठारे अनिल., आधुनिक भारताचा इतिहास.,कल्पना प्रकाशन.,( सुधारित आवृत्ती)., नांदेड .मार्च, 2019.

८. डॉ. बांदिवडेकर प्र.म., लोकशाही प्रक्रिया आणि राजकीय मानसिकता.

९. धर्माधिकारी भाऊ., संपा. गांधी विचार दर्शन., महात्मा गांधी स्मारक निधी., पुणे 1995